# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 24/08/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## फसवणुक

पो.स्टे. काटोल :— फिर्यादी यांनी दि. ०७/०८/२०२३ रोजी त्यांनी त्यांचे मोबाईल मधुन ऑनलाईन शॉपी ॲपवरुन २२५/— रु. किंमतीचे ८ नंबर शुज बुक केले होते ते शुज त्यांना दि. ११/०८/२०२३ रोजी प्राप्त झाले परंतु ते शुज त्यांना लहान झाल्याने त्यांनी ते परत केले परंतु त्याचे पैसे त्यांना मिळाले नसल्याने त्यांनी दि. २१/०८/२०२३ रोजी आपले मोबाईल वरुन गुगलवर सदर ॲपचा कस्टमर केअर नंबर प्राप्त केले त्यातील एक क्रमांक बंद असल्याने त्यातील दुसऱ्या क्रमांकावर कॉल केला असता तेथुन त्यांना मोबाईल नंबर दिल्याने त्यांनी त्यावर कॉल केला असता सदर आरोपीने फिर्यादीचे व्हॉट्सअॅपवर लिंक पाठवुन त्यांना सांगितल्याप्रमाणे करण्यास सांगितल्याने फिर्यादीने आरोपीचे सांगण्याप्रमाणे सर्व काही केलें असता फिर्यादीचे मोबाईलवर त्यांचे खात्यातुन १,००,०००/— रु. काढल्याचा संदेश प्राप्त झाला यामुळे फिर्यादीने घाबरुन मोबाईल बंद केला असता पुन्हा फिर्यादीचे खात्यातुन १,००,०००/— रु. कपात झाल्याचा संदेश प्राप्त झाला. थोडया वेळाने पुन्हा ९,२००/— रु कपात झाल्याचा संदेश प्राप्त झाला. अशाप्रकारे अज्ञात आरोपीने डिजीटल मिडीयाचा वापर करुन स्वत:चे आर्थिक फायदयासाठी फिर्यादीचे खात्यातुन एकुण २,०९,२००/— रुपयाची आर्थिक फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. सहकलम ६६(सी), (डी) माहिति तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास मसपोनि./शितल खोब्रागडे मो. नं. ८३०८०८२०९४ या करीत आहे.

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत ०९ किमी अंतरावर इसापूर रेती घाट येथे दिनांक २३/०८/२०२३ चे ००.५ वा. ते ०१.३० वा. दरम्यान ट्रॅक्टर क्रमांक एम. एच.—२९/सी.— ६४३८ चा चालक आरोपी नामे—१) आकाश वासुदेव लोणारे वय २८ वर्ष, २) मंगेश वासुदेव लोणारे, ३२ वर्ष, रा. वार्ड नंबर ३ ईसापुर हे विनापरवाना अवैधरीत्या मोजा इसापूर कन्हान नदीच्या पात्रातून ट्रॅक्टर मध्ये रेती भरतांनी मिळून आल्याने आरोपीतांच्या ताब्यातून सदर ट्रॅक्टरची किंमत १,५०,०००/— रुपये व त्यासोबत लागलेली ट्रॉली क्रमांक एम. एच.— २९/सी.— ६४३८ किंमती ५०,०००/— रुपये ट्रॉलीत रेती भरलेली मिळून आली ट्रॅक्टर मध्ये अंदाजे एक ब्रास रेती किंमती ४००० रुपयाचा मुद्देमाल, त्यात ४ पावडे किंमती २००/— रुपये, ४ प्लास्टिक घमीले किंमती २००/— रुपये असा एकूण २,०४,४००/— रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे— पोशी. अमित खोब्रागडे, ब. नं. २३०५ पो.स्टे. खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९, १०९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार राऊत मो. नं. ८५५४९६७९४० हे करीत आहे.

## अपघातात मृत्यु

**पो.स्टे. खापा** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील मौजा बावनगाव फाटा टर्निंग जवळ दिनांक २३/०८/२०२३ चे ०७.०० वा. दरम्यान यातील मृतक हा माहारकुंड येथुन मित्राची गाडी क्र. एम. एच. ३१/बी टी.–३८५६ काळया रंगाची मोटरसायकल घेवुन मटन आणण्याकरीता खापा येथे जात असता बावनगाव फाटाच्या टर्निंग जवळ कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणाने चालवून मोटरसायकलला जोरदार धडक मारल्याने वाहन चालक मृतक विकास भिमराव कुंभरे, वय १८ वर्ष, रा. सालेघाट ता. पारशिवनी याच्या मरणास अज्ञात वाहन चालक कारणीभुत झाला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– आकाश भिमराव कुभरे, वय १९ वर्ष, रा. सालेघाट ता. पारशिवनी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापा येथे आरोपी चालकाविरुध्द कलम २७९, ३०४ (अ) भांदवि. सहकलम १८४, १३४ मो. वा. का. कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास नापोशि संतोष परतेती मो. क्र. ९१९२११७५४७ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**